PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Ha Khel Savlyancha
Year: 1976

Song: Gomu Sangatin Majhya Tu
Lyricist: Sudhir Moghe

गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय
गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय
माझ्या पिरतीची राणी तू होशील काय
गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय
आरं संगतीनं तुझ्या मी येणार नाय
आरं संगतीनं तुझ्या मी येणार नाय
तुझ्या पिरतीची राणी मी होनार नाय
गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय
नाय...
गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय

गं तुझं टप्पोरं डोळं जसं कोल्याचं जालं
माझं कालीज भोळं त्यात मासोली झालं
माझ्या प्रीतीचा सुटलाय तुफान वारा वारा
वारा
रं नगं दावूस भलताच तोरा
जा रं गुमान साळसूद चोरा
रं नगं दावूस भलताच तोरा
जा रं गुमान साळसूद चोरा
तुझ्या नजरंच्या जादूला
अशी मी भुलणार नाय
गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय
नाय...

गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय

रं माझ्या रूपाचा ऐना
तुझ्या जीवाची दैना
मी रं रानाची मैना
तुझा शिकारी बाणा
खुळा पारधी रं जाळ्यामंदी
आला आला आला
गं तुला रूप्याची नथ मी घालीन
गं तुला मिरवत मिरवत नेईन
गं तुला रूप्याची नथ मी घालीन
गं तुला मिरवत मिरवत नेईन
तुझ्या फसव्या या जाल्याला
अशी मी गावनार नाय
गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय
गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय
आरं संगतीनं तुझ्या मी येणार हाय
आरं संगतीनं तुझ्या मी येणार हाय
तुझ्या पिरतीची राणी मी होणार हाय
गोमू संगतीनं आरं संगतीनं
गोमू संगतीनं आरं संगतीनं
तुझ्या मी येणार हाय

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*